CNR No.MHKO200001492026

**नियमित दिवाणी दावा क्रं.३४/२०२६**
**श्री. महिपती गणपती कांबळे वगैरे**
**विरुध्द**
**श्री. सदाशिव शंकर कांबळे वगैरे**

## नि.क्र.३५ खालील आदेश

प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश १४ नियम २(२)(ब) व आदेश ७ नियम ११(अ) व (ड) अन्वये दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्रं.६ व ७ यांचे असे कथन आहे की, वादी यांनी सर्व प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा कायम मनाईची दाद मागणीसाठी केला आहे. दाव्यातील कलम ६ मध्ये प्रतिवादी क्रं.६ व ७ यांचे विरुध्द कोणतेही दाव्यास कारण घडलेस नमुद नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश ७ नियम ११(अ) प्रमाणे व आदेश १४ नियम २(२)(ब) प्रमाणे सदरचा दावा प्रस्तुत प्रतिवादी क्रं.६ व ७ यांचे विरुध्द फेटाळणेस पात्र आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ६० प्रमाणे ग्रामपंचायत अधिकारी हा शासन नियुक्त अधिकारी आहे. तसेच कलम १८४ प्रमाणे पंचायतीचे सदस्य हे लोकसेवक असतात. सदर अधिनियमातील कलम १८० प्रमाणे सदर प्रतिवादी क्रं.६ व ७ हे अनुक्रमे पंचायत सदस्य व अधिकारी असलेने त्यांचे विरुध्द ३ महिने पुर्व नोटीस देणे बांधनकारक आहे. दाव्याचे अवलोकन करता अशी कोणतीही नोटीस सदर प्रतिवादी क्रं.६ व ७ यांना वादी यांचे तर्फे देणेबाबत अगर त्यांनी ती स्वीकारणे बाबत कोणतेही विधान अथवा स्पष्टीकरण दावेत केलेले नाही. याही कारणास्तव दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश ७ नियम ११(ड) सह आदेश १४नियम २(२)(ब) प्रमाणे सदर प्रतिवादी क्रं.६ व ७ यांचे विरुध्द सदरचा दावा फेटाळणेस पात्र आहे. वादी यांचा दावा व मागणी अर्ज प्रस्तुत प्रतिवादी क्रं.६ व ७ यांचे विरुध्द खर्चासह नामंजुर करणेत यावा, तसेच प्रस्तुत प्रतिवादी यांना वादी यांनी आकारण पक्षकार करुन खर्चात टाकलेने प्रत्येकी ५,०००/- भरपाई दाखल देणेत यावी अशी विनंती प्रतिवादी क्रं.६ व ७ यांनी केली आहे.

**०३.** वादी यांनी नि.क्र.३७ कडे त्यांचे म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास हरकत नोंदवली आहे. वादी यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा अर्ज खोटा व चुकीचा आहे. वादीने दावेचे कामी परिच्छेद क्र.४ मध्ये प्रस्तुत प्रतिवादींना दावा पुर्व नोटीस पाठवली असलेबाबत स्पष्टपणे नमुद केलेले आहे. वादीतर्फे आजरोजी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये प्रतिवादी क्र.६ यांनी दावा पुर्व नोटीस स्वीकारलेची पोहोच पावत्या दाखल केलेल्या असुन सकृतदर्शनी प्रस्तुत प्रतिवादीने सदरचा अर्ज हा केवळ वादीस त्रास देणेचे उद्देशाने दाखल केला असलेचे स्पष्ट होते. प्रस्तुत प्रतिवादीनी या अर्जाचे कामी नमुद केलेले कारण खोटे व चुकीचे असुन केवळ दावेची चौकशी लांबवणेचे उद्देशाने दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्रं.६ व ७ यांनी या अर्जाचे कामी परिच्छेद क्रं.४ मध्ये केलेल्या विनंत्या चुकीच्या आहेत. सबब, प्रतिवादी क्रं.६ व ७ यांचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०४.** प्रतिवादी क्रं.६ व ७ यांचा अर्ज वाचला. त्यावर वादी यांचे उत्तरे वाचले. वादपत्र व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्रं.६ व ७ यांचेतर्फे विधीज्ञ श्री. एस. के. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी खालील मा. वरिष्ठ न्यायालयाच्या न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.

**A]** ***Bihari Chowdhary & Anr. Vs. State of Bihar & Ors. Reported in (1984) AIR (SC) 1043.***

**B]** ***Bhagchand Dagdusa Gujrathi Vs. The Secretary of State of India reported in (1927) 29 BOMLR 1227.***

**०५.** तसेच वादीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एस. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

## **का र ण मि मां सा**

**०६.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १८०(२) येथे उद्धृत करणे आवश्यक आहे. तो पुढीलप्रमाणे -

<u>**कलम १८० पंचायती इत्यादींविरुद्ध कारवाई करण्यास प्रतिबंध आणि खटला दाखल करण्यापूर्वी पूर्वसूचना-**</u>

(२) या अधिनियमाद्वारे किंवा या अधिनियमांतर्गत केलेल्या किंवा केल्याचे दर्शविलेल्या कोणत्याही कृतीबाबत, कोणत्याही पंचायतीविरुद्ध किंवा तिच्या निर्देशानुसार काम करणाऱ्या तिच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध, अधिकाऱ्याविरुद्ध, कर्मचाऱ्याविरुद्ध किंवा प्रतिनिधीविरुद्ध कोणतीही कायदेशीर कारवाई केली जाणार नाही; जोपर्यंत पंचायतीच्या कार्यालयात आणि ज्या व्यक्तीविरुद्ध कारवाई करावयाची आहे त्या सदस्याच्या, अधिकाऱ्याच्या, कर्मचाऱ्याच्या किंवा प्रतिनिधीच्या निवासस्थानी <u>**लेखी नोटीस देऊन किंवा पोहोचवून तीन महिन्यांचा कालावधी पूर्ण होत नाही, तोपर्यंत अशी कारवाई करता येणार नाही.**</u> या नोटीसमध्ये कारवाईचे कारण, अपेक्षित असलेल्या दाव्याचे स्वरूप, मागितलेली नुकसानभरपाईची रक्कम आणि कारवाई करू इच्छिणाऱ्या व्यक्तीचे नाव व राहण्याचे ठिकाण यांचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**०७.** वर नमुद कलमान्वये ग्रामपंचायत विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यापुर्वी नोटीस देणे बंधनकारक असुन तशी नोटीस दिल्यापासुन तीन महिन्यापर्यंत कारवाई करता येणार नाही असे नमुद आहे. वादीने प्रतिवादी क्रं.६ व ७ यांना नोटीस दिल्याबाबत अभिलेखावर नोटीस व नोटीस पाठवल्याच्या पोष्टाच्या पावत्या दाखल केल्या आहेत. वादीने प्रतिवादी क्रं.६ व ७ यांना दि.२७/०३/२०२६ रोजीची नोटीस दि.२८/०३/२०२६ रोजी पाठवल्याचे दिसत आहे. परंतु अभिलेखावर प्रतिवादी क्रं.६ व ७ यांना नोटीस प्राप्त झाली याबाबत पोहोच पावती दिसुन येत नाही. वादीने दि.२७/०३/२०२६ रोजीची दि.२८/०३/२०२६ रोजी प्रतिवादीला नोटीस पाठवली व दि.२८/०४/२०२६ रोजी दावा दाखल केला. वादीने कलम १८०(२) नुसार नोटीस बजावणी झाल्यापासुन तीन महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर दावा दाखल करणे अनिवार्य होते. परंतु, वादीने तीन महिने संपण्यापूर्वीच प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ कलम १८०(२) चे उल्लंघन झालेले

आहे.

०८. वादीने वादपत्रामध्ये प्रतिवादी क्रं.६ व ७ यांच्या विरुध्द असे कथन केले आहे की, त्यांनी प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांच्याशी संगनमत करुन दावा मिळकतीपैकी काही क्षेत्राच्या असेसमेंट दप्तरी पोकळ व अनाधिकाराच्या अशा चुकीच्या नोंदी केलेल्या आहेत. तसेच प्रतिवादी क्रं.१ ते ५ हे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करण्याच्या उद्देशाने खटाटोप करीत आहेत व त्यांच्या गैरकृत्यास प्रतिवादी क्रं.६ व ७ हे त्यांचे अभिलाषापोटी त्यांना पाठीशी घालत आहेत.

०९. प्रतिवादी क्रं.६ व ७ यांनी प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांच्याशी संगनमत करुन वाद मिळकतीपैकी काही क्षेत्राच्या असेसमेंट दप्तरी पोकळ व अनाधिकाराच्या अशा चुकीच्या नोंदी केव्हा केल्या याबाबत वादीने वादपत्रामध्ये तपशील दिलेला नाही. तसेच प्रतिवादी क्रं.६ व ७ यांच्या विरुध्द केव्हा दाव्याचे कारण घडले याबाबत नमुद केलेले नाही. वादपत्रामध्ये प्रतिवादी क्रं.१ ते ५ हे वाद मिळकतीमध्ये अडथळा निर्माण करत आहेत व अतिक्रमण करुन बेकायदेशीर बांधकाम करण्याचा खटाटोप करीत आहेत असे नमुद आहे. प्रतिवादी अगर ति-हाईत इसमांनी वादीच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये तसेच अतिक्रमण करुन बेकायदेशीर बांधकाम करु नये अशी वादीने वादपत्रामध्ये प्रार्थना केली आहे. प्रतिवादी क्रं.६ व ७ हे दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करुन अतिक्रमण करत आहेत याबाबत वादपत्रामध्ये कोठेही नमुद नाही. प्रतिवादी क्रं.६ व ७ यांच्या विरुध्द वादपत्रातील विनंतीमध्ये तथाकथीत असेसमेंट दप्तरी पोकळ व अनाधिकाराच्या चुकीच्या नोंदी विरुध्द कोणतीही मागणी मागितलेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ खालील अर्ज निकाली काढताना फक्त वादपत्र विचारात घेतले जाते. वादपत्र बारकाईने अवलोकन केले असता वादपत्रामध्ये प्रतिवादी क्रं.६ व ७ यांच्या विरुध्द दावा दाखल करण्यासाठी कोणतेही वाद कारण दिसुन येत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रं.६ व ७ यांच्या विरुध्द वादपत्र फेटाळण्यास पात्र आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश-

| आदेश | |
|---|---|
| १. | नि.क्र.३५ वरील अर्ज मंजुर. |
| २. | प्रतिवादी क्रं.६ व ७ यांच्या विरुध्दचे वादपत्र दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(अ) अन्वये फेटाळणेत येत आहे. |
| ३. | येणेप्रामणे हुकूमनामा तयार करणेत यावा. |
| ४. | खर्चाबाबत आदेश नाहीत. |

(खुल्या न्यायालयात जाहीर)

Digitally signed by DIPAK RUSTUMRAO BORDE
Date: 2026.07.27 17:41:34 +0530

**( दिपक रु. बोर्डे )**

दि.२७/०७/२०२६
कळे-खेरीवडे

दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
कळे-खेरीवडे